नक्षलग्रस्त भागातील गडचिरोली, अहेरी व गोंदिया जिल्ह्यातील अतिसंवेदनशील पोलीस ठाणी / पोलीस उप ठाणी / सशस्त्र दूरक्षेत्रे व कार्यालये येथे व अतिसंवेदनशील क्षेत्रात कार्यरत विविध शाखांचे पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना अनुज्ञेय वेतनाच्या दीडपट दराने वेतन व महागाई भत्ता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : एनएएक्स ०११४/प्र.क्र.२६/वि.शा.१ ब
दुसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० जानेवारी, २०१६

वाचा -

१) **शासन निर्णय क्रमांकः एनएएक्स ०८०९/प्र.क्र.५००/वि.शा.१ ब, दिनांक ११ जानेवारी, २०१०.**
२) **शासन निर्णय क्रमांकः एनएएक्स ०८०९/प्र.क्र.५००/वि.शा.१ ब, दिनांक ३ नोव्हेंबर, २००९.**
३) **शासन निर्णय क्रमांकः एपीओ २८०९/प्र.क्र.२९०/पोल-३, दिनांक ३१ डिसेंबर, २००९.**
४) **शासन निर्णय क्रमांकः एनएएक्स १११०/प्र.क्र.४९९/वि.शा.१ ब, दिनांक १८ फेब्रुवारी, २०११.**
५) **शासन निर्णय क्रमांकः एनएएक्स १११०/प्र.क्र.४९९/वि.शा.१ ब, दिनांक १३ मार्च, २०१२.**
६) **शासन निर्णय क्रमांकः एनएएक्स १०१२/प्र.क्र.४०८/वि.शा.१ ब, दिनांक २२ मार्च, २०१३.**
७) **शासन निर्णय क्रमांकः एनएएक्स ०११४/प्र.क्र.२६/वि.शा.१ ब, दिनांक ३१ मे, २०१४.**
८) **शासन निर्णय क्रमांकः एनएएक्स ०११४/प्र.क्र.२६/वि.शा.१ ब, दिनांक २८ मे, २०१५.**

प्रस्तावना -

नक्षलग्रस्त गडचिरोली, अहेरी (पोलीस जिल्हा) व गोंदिया जिल्ह्यातील अतिसंवेदनशील क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना अनुज्ञेय असलेल्या वेतनाच्या दीडपट दराने वेतन व महागाई भत्ता देण्याबाबतची योजनेस पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

शासन निर्णय :-

संदर्भाधिन दि. २८.०५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये नक्षलग्रस्त गडचिरोली, अहेरी (पोलीस जिल्हा) व गोंदिया जिल्ह्यातील अतिसंवेदनशील क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना अनुज्ञेय असलेल्या वेतनाच्या दीडपट दराने वेतन व महागाई भत्ता देण्याबाबतचे योजनेस दि. ०१.०१.२०१५ ते ३१.१२.२०१५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. आता या शासननिर्णयान्वये सदरहू कालावधी हा दिनांक ०१.०१.२०१६ ते दिनांक ३१.०३.२०१६ असा वाढविण्यात येत आहे.

सदरहू आदेश हे वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ६०५/१५/व्यय-७, दिनांक ११.१२.२०१५ नुसार दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०१३०१२००४८८०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb42793fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2016.01.30 12:01:30 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद,
५) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा,
६) सर्व विधान परिषद / विधान सभा सदस्य,
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग,
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१०) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
११) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई.
१३) अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५) विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपुर / पुणे.
१६) पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.
१७) जिल्हाधिकारी, गडचिरोली / गोंदिया.
१८) पोलीस अधिक्षक, गडचिरोली / अहेरी / गोंदिया.
१९) सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.
२०) गृह विभागातील सर्व अधिकारी.
२१) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर.
२२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२३) निवडनस्ती (वि.शा.१ ब)